**2019 VI 20** **0230** **Seat No.** | | | | | |

**Time : 2½ Hours** **MARATHI (T.L.)**

**Subject Code**

| S | 1 | 3 | 3 |
|---|---|---|---|

**Total No. of Questions : 8** **(Printed Pages : 8)** **Maximum Marks : 80**

***सूचना :*** (*i*) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहा.

(*ii*) प्रश्नांचा क्रमांक व उपप्रश्नांचा क्रमांक स्पष्टपणे लिहा.

(*iii*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*iv*) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

1. (अ) पुढील प्रत्येक अपूर्ण विधानाखाली चार पर्याय दिलेले आहेत. त्यातील अचूक पर्याय पाठ्यपुस्तकाच्या आधारे निवडून अपूर्ण विधान पूर्ण करून पुन्हा लिहा : 2

(1) प्रचंड बुंधा असलेल्या ................................ .

(अ) वडाच्या झाडाला पोखरी असतात

(ब) आंब्याच्या झाडाला पोखरी असतात

(क) मोहाच्या झाडाला पोखरी असतात

(ड) पिंपळाच्या झाडाला पोखरी असतात

(2) गाडेकार खरी धमाल उडवी ती ································ .

(अ) चतुर्थीच्या चार पाच दिवसात

(ब) दिवाळीच्या चार पाच दिवसात

(क) दसऱ्याच्या चार पाच दिवसात

(ड) होळीच्या चार पाच दिवसात

(ब) पुढील उद्गार कोणी व कोणास उद्देशून काढले आहेत ते लिहा : 3

(1) ''युद्ध अमानुष आहे हे खरेच, परंतु माणुसकीचा अपूर्व अनुभवही युद्धात येतो हे त्याहूनही खरे''.

(2) ''गजाननाला दंडवत घालून येतो.''

(3) ''आता तुमची मान सदैव उंच राहील''.

(क) खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे **एका** वाक्यात लिहा : 3

(1) पोर्तुगीजांच्या जाचातून गोवा केव्हा मुक्त झाला ?

(2) कुशाबा पाटील कोणत्या वाहनातून बस स्टॉप कडे येत होता ?

(3) पाटलांना कशाप्रकारचा न्याय हवा होता ?

(4) समुद्र विंचवाचे घर कसे दिसते ?

(ड) खाली आपल्या पाठ्यपुस्तकातील **एका** धड्याचे नाव व कंसात लेखकांची नावे दिलेली आहेत. दिलेल्या धड्याच्या लेखकाचे नाव लिहा : 1

चोरी

(रा. ग. गडकरी, ग. प्र. प्रधान, मधु मंगेश कर्णिक)

2. (अ) खालील कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे **दोन** ते **तीन** वाक्यांत लिहा : 4

(1) उदमांजराविषयी लेखक काय सांगतात ?

(2) मेजर रॉयच्या मते सैन्यात नसणारे लोक अधिक भाग्यवान का ?

(3) चांगला पोशाख घालून निघालेला गोकूळ अर्ध्यावरून घरी परत का आला ?

(ब) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे **चार** ते **पाच** वाक्यांत लिहा : 6

(1) लक्ष्मीने 'शील' गुणाचे महत्त्व कसे सांगितले ?

(2) 'आपलं एखाद शेत का नाही' असा विचार गोपूच्या मनात का आला ?

(3) लेखिकेने काश्मिरी मुलीला 'निसर्गकन्या' असे का म्हटले आहे ?

3. (अ) पुढील अपूर्ण विधानाखाली दिलेल्या **चार** पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून ते विधान पूर्ण करून पुन्हा लिहा : 1

(1) हवेत पेटला

(अ) वादळाचा घुमारा

(ब) सुडाचा घुमारा

(क) पावसाचा घुमारा

(ड) अग्नीचा घुमारा

(ब) तुमच्या पाठ्यपुस्तकातील कवितांच्या आधारे 'अ' गटात दिलेल्या काव्यांशाशी 'ब' गटात दिलेल्या काव्यांशाच्या पर्यायापैकी योग्य पर्याय जोडून काव्यपंक्ती पुन्हा लिहा : 2

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| (1) आठवा मनी शिवाजी | (अ) मन माऊली सकळांची |
| (2) मने प्रतिमा स्थापिली | (ब) आठवा शहाजी |
| | (क) मने मना पूजा केली |
| | (ड) आठवा प्रतापगाजि |

(क) खालील कवितांच्या ओळीतील मोकळ्या जागी कंसात दिलेल्या पर्यायी शब्दांपैकी योग्य शब्द घालून ओळी पूर्ण करून पुन्हा लिहा : 2

(1) सदा सर्वदा .............................. काही करीना.

(गोष्ट, पाठ, काळ)

(2) बळ हेच .............................. देती पराक्रमाचे.

(दुर्बळांना, सबळांना, अबलांना)

4. (अ) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 2

(1) सोन्याचा गोळा असे कवीने कोणास म्हटले आहे ?

(2) ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी संत नामदेवांनी कोणता मार्ग सांगितला ?

(3) पंथ, जात, धर्म याचे भेदाभेद ज्यांना ठाऊक नाहीत अशी माणसे काय जाणतात ?

(ब) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **तीन** ते **चार** वाक्यांत लिहा : 6

(1) कवी भा. रा. तांबे यांनी सायंकाळच्या वेळेचे वर्णन कसे केले आहे ?

(2) कवी विंदा करंदीकर समाजरूपी ईश्वराची पूजा कशी करायला सांगतात ?

(3) 'मन करा रे प्रसन्न' या अभंगातून तुकारामांनी परमार्थाची शिकवण कशी दिली आहे ?

5. (अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** वाक्प्रचाराचा अर्थ लिहून त्या वाक्प्रचाराचा योग्य वाक्यांत उपयोग करून लिहा : 2

(1) हतबुद्ध होणे.

(2) मीठ मसाला पुरवणे.

(ब) खालील विधाने कंसातील सूचनेप्रमाणे लिहा : 4

(1) मी होडीत बसलो.

(प्रयोग ओळखून लिहा)

(2) ज्ञान मिळविण्याची उत्सुकता.

(शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा)

(3) त्यादिवशी गावांतील सरव लोक दु:खी झाली.

(वाक्य शुद्ध करून लिहा)

(4) गावात तो गाडेकार म्हणून प्रसिद्ध आहे.

(भूतकाळात लिहा)

(क) पुढील वाक्यांतील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखून लिहा : 2

गोपू बांधा<u>वरून</u> खाली उतरला व आई शेजारी <u>बसला</u>.

(ड) कंसातील सूचनेप्रमाणे बदल करून लिहा : 8

(1) विश्वास, पुण्य, बर्फ. (कोणत्याही दोहोंची विशेषण बनवा)

(2) नवल, रसिक, पाटील. (कोणत्याही दोहोंची भाववाचक नामे बनवा)

(3) देऊळ, सवड, मृत्यू. (कोणत्याही दोहोंचे समानार्थी शब्द लिहा)

(4) सुंदर, अंधार, सावध. (कोणत्याही दोहोंचे विरुद्धार्थी शब्द लिहा)

6. (अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **अठरा** ते **वीस** ओळीत निबंध लिहा : 7

(1) निसर्ग – मानवाचा सोबती.

(2) वर्तमानपत्रांचे महत्त्व.

(3) पक्ष्याचे आत्मवृत्त.

(4) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक.

(ब) खालील मुद्यांच्या आधारे सुमारे **दहा** ते **पंधरा** ओळीत गोष्ट लिहून तिला योग्य शीर्षक द्या : 5

एक गरीब गृहस्थ – मिठाई खरेदीसाठी जाणे – दुकानदाराने मिठाईचे कमी वजन करणे – गिऱ्हाईकाची तक्रार – 'तुला तेवढच ओझं कमी' – दुकानदार – गिऱ्हाईक ही हुशार – पैसे मोजायचा त्रास नको – दुकानदाराचे 'आ वासून राहणे.

7. (अ) व्यापारी व गिऱ्हाईक यांच्यामध्ये झालेला संवाद **पाच** ते **सहा** ओळीत लिहा : 5

(ब) रोहन/रोहिणी राठोड, खाराबाध, कुंक्कळी-गोवा हा/ही मडगांवला राहाणाऱ्या किशोर/किशोरी या मित्राला/मैत्रीणीला गांवच्या जत्रेसाठी निमत्रंण देणारे पत्र लिहितो/लिहिते. या पत्राचा नमुना दहा ते बारा ओळीत लिहा. 5

8. (अ) भाऊसाहेब बांदोडकर विद्यालय, पेडणे-गोवा येथे साजरा झालेल्या वार्षिक स्नेह संमेलनाचा वृत्तान्त खालील मुद्यांच्या आधारे **दहा** ते **बारा** वाक्यांत तयार करून लिहा : 5

वार्षिक स्नेहसंमेलन – प्रमुख पाहुणे कोण होते – त्यांचे स्वागत – परिचय कोणी करून दिला – गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार – प्रमुख पाहुण्यांच्या भाषणातील महत्त्वाचे दोन मुद्दे – सांस्कृतिक कार्यक्रम – आभार प्रदर्शन आणि सूत्रसंचालन कोणी केले.

(ब) खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

पर्यावरण म्हणजे निसर्ग. झाड, पक्षी, प्राणी, जमीन, हवा, पाणी, सूर्य, डोंगर यांचा एकत्रित शब्द म्हणजे निसर्ग. उघड्या डोळ्यांनी आपण निसर्गाकडे पाहिल्यास आपल्याला इथे अनेक गुरु भेटतात. निसर्ग आपल्या कृतीतून माणसाला शिक्षण देतो. दुसऱ्यांसाठी आहे ते दुसऱ्याला देत जा असे नद्या सांगतात. गगनाला गवसणी घालण्याची आकांक्षा पर्वत देतात. दुसऱ्यासाठी जगणे हेच खरे जीवन ही शिकवण झाडांपासून मिळते. धरणीमाता क्षमाशीलता शिकवते. भिंतींवर जाळे विणणारे कोळी प्रयत्नांची कास धरायला शिकवतात. मधमाशांचे पोळे चिकाटीची शिकवण देते. माणसाचे आयुष्य-प्रकाशमान करणारा सूर्य आपले काम न कंटाळता उत्साहाने

करा असा संदेश देतो. मनाची शांती कायम ठेवा ही शिकवण चंद्राकडून मिळते. त्यामुळे निसर्ग हा सर्वश्रेष्ठ गुरु आहे.

**प्रश्न :**

(1) धरणीमाता आपल्याला काय शिकवते ? 1

(2) सूर्य आपल्याला कोणता संदेश देतो ? 1

(3) निसर्ग माणसाला कशा प्रकारे शिक्षण देतो ? 1

(4) नद्यांपासून कोणती शिकवण मिळते ? 1

(5) उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. 1